بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصاراللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# यशस्वीपणे संपन्न झालेल्या जलसा सालाना जर्मनीबाबत, व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांना महत्त्वपूर्ण उपदेश आणि अभ्यागतांची प्रतिक्रिया

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. ८-९-२०२३ स्थान मशिद बैतुस् सुबूह फ्रांक्फर्ट, जर्मनी

اَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ اَمَّا بَعْدُ فَاَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहानंतर हुजूर म्हणालेः सर्वशक्तिमान अल्लाहच्या कृपेने गेल्या आठवड्यात अहमदिया जमाअत जर्मनीचा वार्षिक सम्मेलन यशस्वीपणे पार पडला. सर्व प्रथम, आपण सर्वशक्तिमान अल्लाहचे आभार मानले पाहिजे की त्याने मोठ्या अंतरानंतर सामान्य परिस्थितीनुसार आपल्याला वार्षिक सम्मेलन आयोजित करण्यास सामर्थ्य दिले.

प्रशासन आणि सहभागींनी सर्वशक्तिमान अल्लाहचे आभार मानले पाहिजेत. कामगारांनी देखील आभार मानले पाहिजे की सर्वशक्तिमान अल्लाहने त्यांना हजरत अपेक्षित मसीहच्या पाहुण्यांची सेवा करण्याची संधी दिली. या मोठया भव्य सभारंभात अनेक ठिकाणी त्रुटी होत्या, अनेक पाहुण्यांनी त्रास सोसले पण धार्मिक उद्देशातून आल्याने त्यांनी तक्रार केली नाही तरीही काहीं व्यवस्था योग्य नसल्याचे मला आढळले.

कामगारांनी आपले कर्तव्य अत्यंत चिकाटीने पार पाडले. जिथे त्यांच्यात किंवा विभागात काही कमतरता आढळली ते त्यांच्या अधिकार्यांच्या चुकीच्या सूचनांमुळे होते. जिथे पाहुण्यांना त्रास झाला त्याला अधिकारी जबाबदार आहेत. याकरिता क्षमा मागितली पाहिजे आणि भविष्यासाठी लाल पुस्तकात लिहून दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

लिफ्ट काम करत नव्हत्या, खूप कमी स्नानगृहे होती, पाण्याची व्यवस्था नीट नव्हती. सिक्युरिटीचे लोक विनाकारण अडवत राहिले, भाषांतरातही अडचण आली. ध्वनीची देखील समस्या होती. काही पाहुण्यांनी तक्रार केली की आम्हाला प्रवचन ऐकू येत नव्हते. सम्मेलनाच्या वेळीही मी प्रशासनाला आठवण करून देत राहिलो. वार्षिक सम्मेलनाचे अधिकारी, सभामंडपाचे प्रभारी अधिकारी आणि ध्वनी विभाग याला जबाबदार आहेत. सम्मेलन ऐकण्यासाठी लोक येथे येतात. इतर व्यवस्थेतील उणिवा सहन केल्या जाऊ शकतात, पण जलसा ऐकण्याच्या व्यवस्थेत कोणतीही कमतरता स्वीकार्ययोग्य नाही.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणाले आहे की, हा वार्षिक सम्मेलन सण किंवा उत्सव नाही जिथे लोकांचा जमाव होतो. हॉलमधील मागे स्थानांपर्यंत आवाज येत नव्हती आणि परिणामस्वरुप तिथली स्थिती सणातील गोंधळ माजल्यासारखी झाली होती. माझ्या अंदाजानुसार,

किमान सात ते आठ हजार लोक असे आहेत की ज्यांनी सम्मेलनातील कार्यवाही नीट ऐकली नाही. यासाठी व्यवस्थापन लोकांना जबाबदार ठरवत आहे. पण जर लोक बोलत होते तर त्यामागे देखील त्यांच्या प्रबोधनाचा अभाव दिसतो आणि मिश्नरी इंचार्ज आणि प्रचारक यासाठी जबाबदार आहेत, की त्यांनी वर्षभर त्यांचे प्रबोधन केले नाही. लोकांना दोष देऊ नका. अहमदी सहसा लक्ष दिल्यावर सकारात्मक प्रतिक्रिया देतात. यावर्षी महिलांमध्ये पुरुषांपेक्षा चांगली शिस्त होती. पुरुषांच्या प्रशिक्षण विभागाने स्वतःची काळजी घेतली पाहिजे.

विकसनशील राष्ट्रे आपल्या कमकुवततेवर लक्ष ठेवतात, मगच ते यशस्वी होतात. सगळं काही चांगलं आहे असं सांगून विकासाचा मार्ग अडवू नका, त्यात कसलीही लाज बाळगू नका. सर्वशक्तिमान अल्लाह विभागातील अधिकाऱ्यांना स्वतःला सुधारण्याचे शक्ति देवो. या सर्व उणिवां असूनही, सर्वशक्तिमान अल्लाहचा आम्हांवर उपकार आहे की त्याने आमच्या उणिवां लपवता सम्मेलनात सामील झालेल्या सदस्यांवर सामान्यतः चांगला प्रभाव राहिला. पाहुण्यांनी विलक्षण प्रतिक्रिया दिल्या. जर्मनी जमाअतला अल्लाहचे आभार मानले पाहिजे की त्याने ज्या सम्मेलनाद्वारे एका मोठ्या संख्येपर्यंत इस्लामचा अस्सल संदेश प्रसारित केला.

हुजूर अनवर यांनी पाहुण्यांची प्रतिक्रिया मांडताना सांगितले की, बल्गेरियातील एक ख्रिश्चन महिला, वेरोनिका साहिबा, जी एक वकील आणि पीएचडी डॉक्टर आहे, यांनी सांगितले की, एवढी उत्कृष्ट सभा आयोजित करण्यात आली होती की लोकांच्या चेहऱ्यावर कोणाचीही भीती किंवा चिंता दिसली नाही. हा सम्मेलनाचा ठसा माझ्या हृदयावर उमटला आहे. बल्गेरियातील आणखी एक ख्रिश्चन महिला नतालिया म्हणते की ही भेट माझ्या मनात कायम राहील. प्रथमच हजारो मुस्लिम एकत्र प्रार्थना करताना पाहिले. सर्व लोक आनंदाने वावरले. खलीफा साहेबांचे भाषण अतिशय प्रभावी होते.

मॅसेडोनियातील एका ख्रिश्चन पत्रकाराचे म्हणणे आहे की या सभेचे आयोजन अत्यंत उच्च पातळीवर होते. माझ्यासाठी हा खूप मोठा सन्मान आहे की मी अशा सभेत सामील झालो ज्यामध्ये विविध धर्म आणि राष्ट्रांचे लोक सामील झाले. मॅसिडोनियातील आणखी एका पत्रकाराने सांगितले की, खलीफा साहेबांचे विविध विषयांवरील भाषणांनी मला खूप प्रभावित केले. मला अनेक अहमदी मुस्लिमांशी बोलण्याची संधी मिळाली. ते खूप प्रेमाने आणि हसतमुखाने बोलत असत. प्रेम सर्वांसाठी आणि द्वेष कोणाचाही नाही, याचे व्यावहारिक उदाहरण पाहिले आणि या ब्रीदवाक्याने जगात शांतता नांदू शकते.

स्लोव्हाकियातील मार्टिना साहिबा या महिला शिक्षिका सांगतात की त्यांनी पाहुणचाराचे असे उदाहरण यापूर्वी कधीही पाहिले नाही. दीक्षा सभारंभ आणि प्रार्थनेच्या दरम्यान ती त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकली नाही. स्लोव्हाकियातील आणखी एक पाहुणे सांगतात की त्यांना वार्षिक सम्मेलनापूर्वी इस्लामबद्दल काहीही माहिती नव्हते. सम्मेलनात सामील होऊन मला सर्वशक्तिमान अल्लाह आणि पवित्र पैगंबर (स.) यांचे उच्चस्थान ज्ञात झाले. अहमदींनी अतिशय समर्पण आणि उत्साहाने पाहुण्यांची सेवा केली. स्लोव्हाकियाहून आलेले आणखी एक पाहुणे सांगतात की, अहमदी लोकांची नीतिमत्ता आणि आदरातिथ्य पाहून मी खूप प्रभावित झालो. अल्बानियातून आलेल्या एका पाहुण्याने जे प्राध्यापक आणि डॉ. आहेत म्हणाले, की वार्षिक सम्मेलन भव्य होता. आणि सम्मेलनात सामील होऊन हे पटले की तुमच्या एकात्मतेचे स्त्रोत आणि गाभा खिलाफत आहे.

बोस्नियाचे इतिहासाचे प्रोफेसर हरीस साहिब सांगतात की सभेत सर्व गोष्टींचे नियोजन करण्यात आले होते. खूप चांगली व्यवस्था होती. खलिफा साहेबांच्या पहिल्या भाषणाने माझे मन मोकळे झाले. त्यांच्यासोबतच्या भेटीचा माझ्या मनावर खूप सकारात्मक परिणाम झाला आणि मला खूप आराम वाटला. बोस्निया रेडक्रॉस संघटनेची सेक्रेटरी इंदिरा हैदर सांगतात की, खलीफासोबतची भेट खूप आनंददायक होती. मला अभिमान वाटला.

जॉर्जियातील एका महिलेने सांगितले की, पहिल्यांदा सम्मेलनात सामील होण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. तरुण आणि प्रौढ तन्मयतेने काम करत होते. दीक्षा समारोह पाहताना भावनांवर नियंत्रण ठेवणे कठीण होते. जमाअतच्या खलिफाने लेखणीद्वारे जिहादची जी संकल्पना आपल्यासमोर ठेवली, त्याचे मी शंभर टक्के पुष्टी करते. मला ठाम विश्वास आहे की जग भविष्यात इस्लामचा विचार करेल आणि लोक त्याद्वारे विधात्याला ओळखणारे बनतील.

जॉर्जियातील एक सुन्नी विद्वान सांगतात की ख्रिश्चन धर्म सोडून इस्लाम स्वीकारल्यानंतर ते मदिना येथे राहिले. अहमदी लोक आम्हाला काफिर म्हणतात आणि त्यांचा विश्वास वेगळा आहे हे त्यांनी ऐकले होते. वार्षिक सम्मेलनात सामील होऊन अहमदी लोकांना जवळून पाहण्याची संधी मिळाली आणि खलिफाची भाषणे लक्षपूर्वक ऐकली, तुम्हां लोकांना काफिर म्हणणे चुकीचे आहे. माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे तीन दिवसांच्या वार्षिक सम्मेलनात मिळाली.

कोसोवोहून आलेले शिक्षण संचालक सांगतात की, सम्मेलनातील खलीफा साहेबांचे प्रवचनांनी मला खूप प्रभावित केले. आदरातिथ्यचा अनुभव नेहमी माझ्या हृदयात राहील. कोसोवोचे महापौर म्हणतात की या असामान्य सभेतील एकता आणि बंधुत्वाच्या दृश्यांनी माझ्या मनावर खोलवर छाप सोडली आहे. खलिफाचे भाषण प्रभावी होते. आतिथ्य अप्रतिम होते.

कॅमेरूनच्या एका प्रमुख इमामचे म्हणणे आहे की ते पहिल्यांदाच इतक्या मोठ्या कार्यक्रमात सामील झाले आहेत. हे आश्चर्यकारक आहे की विविध रंगांचे लोक एका कुटुंबासारखे भेटले. इमामचे भाषण विवेकपूर्ण आणि इस्लामिक शिकवणींच्या ऐन अनुसार होते. याचे पालन केले तर जीवन नंदनवन होईल.

इस्लामी तत्त्वांचे तत्त्वज्ञान लाथुआनियन भाषेत अनुवादित करण्यासाठी स्वेच्छेने काम केलेल्या लिथुआनियाच्या या महिलेचे म्हणणे आहे की वार्षिक सम्मलनाने मला जमाअतचे परीक्षण करण्याची एक चांगली संधी मिळाली. अहमदिया जमाअत खऱ्या रंगात त्यांचे ब्रीदवाक्य पाळत आहे.

जर्मनीत राहणाऱ्या तुर्की महिला शिक्षिका यास्मिन साहिबा सांगतात की खलिफाचा साहेबांचा भाषण माझ्या प्रश्नांची उत्तरे होती. वार्षिक सम्मेलनाचे वातावरण मला खूप आवडले. इतके लोक एकत्र येणे आणि प्रेमाच्या बंधनात गुंतवूण राहणे ही एक असामान्य आणि आश्चर्यकारक गोष्ट होती. सर्बियातील एका पत्रकाराने सांगितले की, सम्मेलनामध्ये तुमच्या चांगल्या व्यवस्थापनाने आश्चर्यचकित केले. प्रशासन कार्यात किंवा ४०,००० लोकांमध्ये कोणतेही वाईट प्रवृत्ती आढळली नाही. सर्बियातील आणखी एक महिला पत्रकार म्हणते की मला कर्मचारीं आणि सहभागींबद्दल प्रेमाची भावना आहे. खलिफाचे महिलांना केलेले संबोधन खूप प्रभावी होते.

एका जर्मन ख्रिश्चन कॅथोलिक टीव्हीच्या प्रतिनिधीने सांगितले की, खलिफाचे भाषण प्रेरणादायी होते. भाषण असे होते की फक्त ऐकणे पुरेसे नाही तर त्यावर सखोल विचार करणे आवश्यक आहे. सभेत अदबीने दुपट्टा घालून बसलेली एक जर्मन महिला सांगते की, भाषणादरम्यान

माझ्या हृदयावर इतका परिणाम झाला की माझे डोळे ओले झाले. खलिफाचे शब्द खरंच हृदयस्पर्शी होते.

सम्मेलाबाबत जर्मनीमध्ये चांगले मीडिया कव्हरेज झाली. चार टीव्ही चॅनेल्सच्या माध्यमातून एकेचाळीस दशलक्ष लोकांपर्यंत, अकरा वृत्तपत्रांद्वारे पन्नास दशलक्ष, पाच रेडिओ केंद्रांद्वारे चौदा दशलक्ष आणि ऑनलाइनद्वारे दोन दशलक्ष लोकांपर्यंत ही बातमी पोहोचली. सर्वशक्तिमान अल्लाह त्याचे चांगले परिणाम घडवो.

लोकांनी व्यक्त केलेली काही मते ही सर्वशक्तिमान अल्लाहचे आभार आणि कृपा आहे की त्याने आपल्याला झाकले आहे. विविध मशिदींच्या उद्घाटनाच्या वेळीही लोकांनी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या आणि म्हणाले की इस्लामबद्दलचे आमचे मत बदलले आहे. त्यांनी अशीही तक्रार केली आहे की आमचे परिचित अहमदींनी इस्लामच्या सुंदर शिकवणींबद्दल आम्हाला माहिती पुरवली नाही. म्हणून प्रत्येक अहमदीला गौणत्वाची भावना न ठेवता इस्लामची आणि हजरत अपेक्षित मसीहची ओळख करून दिली पाहिजे. फक्त पत्रिका वाटून उद्देश साध्य होत नाही. लोकांना अजूनही धर्माबद्दल ऐकण्यात रस आहे.

आम्हाला सर्वत्र आकलन घेतले पाहिजे. उणिवा दूर करून सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सर्वोत्कृष्टाचा शोध चालू ठेवा. सर्वशक्तिमान अल्लाहला मदतीसाठी प्रार्थना करून कामाला सुरुवात करा. व्यवस्थापन आणि सहभागींनी सम्मेलनाचा उद्देश पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रयत्न करावेत. सर्वशक्तिमान अल्लाह आपल्यावर दया करो आणि सम्मेलनाची भविष्यातील उद्दिष्टे पूर्ण करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔